# <u>परस्पर सवांद आणि सामंजस्य महत्त्वाचे</u>

**वर्तमान, दिवाळी अंक १९८६**

आमच्या घरात सुरुवातीपासून शिक्षणाला अतिशय पोषक वातावरण होतं. माझे वडिल संस्कृतचे प्रोफेसर त्यामुळं आपल्या मुलांनी खूप शिकावं असं साहजिक त्यांना वाटे. आई-वडिल दोघेही पुरोगामी विचाराचे होते. मुलगा-मुलगी भेद त्यांनी कधीच केला नाही. मी सगळ्या भावडांत मोठी. माझ्यानतंर एक बहीण आणि सगळयात धाकटा भाऊ. माझ्या वडिलांना फिरायची खूप हौस. मी मोठी असल्यानं त्यांच्या पटकन हाताशी आले. त्यामुहे मला त्यांच्याबरोबर खूप हिंडायला मिळालं. मुलीनं एवढं हिंडून करायचंच काय वगैरे वृत्ती त्यांच्याजवळ नव्हती. त्यावेळेस आम्ही बिहारमध्ये दरभंगा या जिल्हा मुख्यालयाच्या शहरांत रहायचो. मुळात बिहार हे तसं मागासलेलं राज्य. त्यामुळे आम्ही राहात असलेलं शहराचं ठिकाणही जुन्या वळणाचच होतं. पण त्यांनी मला सायकल शिकायला लावली. लोक हसतात तर हसू देत, पण तू सायकल वरूनच शाळेत गेलं पाहिजेस. असं ते सांगायचे. आपण धीट बनून रहायला पाहिजे, मग बाकीचे काही का म्हणेनात, हे त्यांचं ठाम मत होतं. वडिलांप्रमाणे माझ्या आईचाही माझ्यावर प्रभाव आहे. मी मोठी असल्यानं साहजिकच आईला बरीच मदत करायचे, पण ही मुलगी म्हणून हिनं घरकामात मदत केलीच पाहिजे अशा पध्दतीनं कधीचं आईने विचार केला नाही. घरातल मोठं मूल या नात्याने आई-वडिलांना घरकाम, बाजार, व इतर बाहेरच्या कामांत मदत करायला हवी अशा पध्दतीनंच तिनं या बाबीकडे पाहिलं. विशेषतः अभ्यास करत बसली असेल तर घरकामासाठी उठवायचे नाही हा तिचा नियम. माझे आजोबा माझ्या लहानपणीच वारले. पण आपल्या नातवंडांनी गणितात पुढं यावं अशी त्यांची फार इच्छा होती. मी पहिल्यापासून हुशार आणि गणिताची आवड. त्यामुळेते होते तोपर्यंन्त त्यांनी मला गणित शिकवलं. माझ्या आत्याची, काकांची मुलंही त्यांच्या अवतीभोवतीच असायची. त्यांना मात्र ते कधी गणित शिकवायचे नाहीत. विचारलं तर म्हणायचे, अरे, तिला गणिताची आवड आहे म्हणून शिकवतो. तुम्हाला ज्याची आवड आहे ते तुम्हालाही शिकवीन, या सगळयामुळे मुलगी म्हणून मला काही वेगळं वागवल जातंय असं कधीच जाणवलं नाही. तुझ्याकडे हे हे गुण आहेत. ते वाढवण्यासाठी तू प्रयत्न केले पाहिजेस. आणि दोष आहेत ते सुधारायचा प्रयत्न केला पाहिजेस असचं मला सतत सांगितलं गेलं. शिवाय मोठी मुलगी म्हणून घरातले प्रश्न, चिंता, काळज्या व जबाबदा-या आपणहून सयजून घ्यायची सवय लागली.

मी आय.ए.एस. झाले ते काही फार योजनापूर्वक नव्हत. इंटर सायन्सला व बी.एस्सीला मला सगळया विषयात चांगले मार्क होते. माझा कल बघून तू संशोधनाकडं वळ असा मला खूपजणांनी सल्ला दिला. मलाही तो पटला. कांही काळ मी मायक्रोवेव्ह टेक्नॉलॉजीत संशोधनही केलं. त्यावेळेस मी हॉस्टेलवर रहायची. माझ्या कांही मैत्रिणींनी आय.ए.ए.ची परीक्षा द्यायची ठरवल्यावर त्यांचं बघून मीही ती परीक्षा दिली.

महाराष्ट्रात आय.ए.एस.ची परीक्षा म्हणजे नेमकं काय असतं, त्याचा अभ्यास काय असतो, पास झाल्यावर पूढं काय करावं लागत याची फारशी माहिती नसायची. त्यामुळे हुषार मुलं-मुलीही इकडे फिरकत नसत. पण उत्तर प्रदेश, कलकत्ता, मद्रास, दिल्ली, बिहार या ठिकाणी आय.ए.एस.ला बसणारी मुलं ही दुर्मिळ बाब नाही.हुषार लोकांनी ही परीक्षा द्यायचीच असं जवळजवळ ठरूनच गेलेलं असतं.

मी लेखी परीक्षा दिली आणि पुढल्या गोष्टी झपाट्यानं घडल्या. लेखी परीक्षा पास झाल्यावर मला मुलाखतीचं बोलावणं आलं. पुढे नेमणूकीसाठी महाराष्ट्र राज्य देण्यात आलं आणि पुण्यालाच उपजिल्हाधिकारी म्हणून नेमणूक झाली. या सगळया गोष्टी इतक्या भरभर घडल्या की मागं वळून पहाणं, किवां थोडंसं थांबून विचार करणं हे जमलंच नाही.

याचं सुमारास माझं लग्न ठरत होत. त्यावेळेस मी लेखी परीक्षा दिली होती. त्याचा निकाल अजून आला नव्हता. पण सासरच्या लोकांना अशी परीक्षा दिली आहे याची आधीच कल्पना दिली होती. त्यांनीही तुला यात करिअर करायचं तर कर असं खुल्या मनानं सांगितलं होतं. याबाबतीत मी फार सुदैवी असं म्हटलं पाहिजे. मी पुण्यांन उपजिल्हाधि-त्रकारी असतांना एका प्रौढ तहसिलदारांचा मुलीनंही आय.ए.एस.ची परीक्षा दिली होती आणि लेखी परिक्षेत तिची निवडही झाली होती. पण तिचं जिथ लग्नं ठरलं होतं त्या घरच्यांनी तिला या क्षेत्रात करिअर करायला आक्षेप घेतला आणि विशेष म्हणजे ती मुलगी देखील हे सगळं सोडायची कबुली देऊन लग्न करून मोकळी झाली. माझ्याबाबतीत मात्र हे घडलं नाही. खरं तर आय.ए.एस.साठी निवड झाल्यावर कुठं व काय काम करावं लागतं, बदल्या फार होतात कां याची कुणालाच कल्पना नव्हती. ती आल्यावर मात्र सगळयांनीच आनंदानं ते स्वीकारल. माझ्या सास-याना तर माझा फार अभिमान वाटायचा.

आमचं लग्न झालं तेंव्हा मेहेदळे कलकत्त्याला फिलिप्स मधे होते. मला बंगाल राज्य मिळालं तर त्यांनी तिथेच राहायचं, महाराष्ट्र मिळालं तर पुण्याला बदली करून घ्यायची असं आमचं ठरलं होतं. त्याप्रमाणे त्यांनी पुण्याला बदली करून घेतली. मलाही सुरूवातीला पुण्या-मुंबईला रहायला मिळालं. नंतर मात्र अधून मधून कांही वर्ष मला बाहेरगावी पोस्टिंग मिळालं. पण सगळं व्यवस्थित जमून गेलं.

जरा वेगळया पध्दतीचं क्षेत्र मी निवडलं तरी त्यात बाई म्हणून मला काही त्रास झाला नाही. सुरवातीलाच तुमचं प्रशिक्षण हे प्रत्यक्ष जिल्हाधिका-याच्या देखरेखीखाली चालू असतं, दौरे वगैरे सुध्दा गाडीतूनच करावे लागतात. त्यामुळं काहीच अडचण येत नाही. नंतरही तुमची जी नेमणूक होते ती इतकी उच्च पदावर असते की बाई म्हणून वाट्याला उपेक्षा यायचा प्रश्नच उद्‌भवत नाही. अर्थात् नवीन असतांना अनेक गोष्टी माहित नसतात. पण त्या गोष्टी तुम्ही किती पटकन शिकता, त्या शिकायची तुमची किती इच्छा आहे यावर खूप काही अवलंबून असते. हाताखालचे जे अधिकारी असतात. ते पंधरा वीस वर्ष या कामात मुरलेले असतात. त्यामुळे त्यांचं बरोबर लक्ष असतं. एखाद्या वरिष्ठ पुरुष अधिका-याला जर कळत नसेल तर साहेब लहान आहेत, साहेबांना कळत नाही एवढंच ते म्हणतील पण बाई जर हे सगळं समजावून घ्यायला कमी पडली तर बाई आहे म्हणून समजत नाही असा थोडा टवाळकीचा सूर त्यांना मिळतो. पण एकदा हया सुरुवातीच्या कसोटीतून तुम्ही पार पडलात तर मात्र सगळयांची टीका बंद होते.

माझे सहकारी माझ्याशी चांगले वागतात ते मी बाई म्हणून वागतात की नाही हे मला माहित नाही, पण छोट्या गावातून मी फिरते तेव्हा बाई असल्याने मला चांगले अनुभव येतात. एक तर आम्हाला असलेल्या जबरदस्त अधिकारांची जाणीव गावात असते. प्रत्येक ठिकाणी मी गाडीनं जाते, माझ्याबरोबर शिपाई असतो. हाताखालचे क्लार्क असतात. त्यामुळे शिक्षिका किवां नर्स म्हणून काम करणा-या बायकांना लहान गावात जो त्रास होतो त्याचा अनुभव मला येत नाही. उलट खूप आदरांन लोकं वागवतात. पुरूष अधिका-यांसमोर पुरूष गांवकरी कशाचीही भीड न ठेवता आपले मत सांगून मोकळे होतात. पण स्त्री अधिकारी म्हटल्यावर ते मोकळेपणी बोलले तरी त्यांत एक अदब असते. आपल्या बोलण्याने समोरची बाई दुखावली जाऊ नये म्हणून ते सावध असतात.

अर्थात् जिथं अधिकार असतो, तिथं त्याचा दुरूपयोग आलाच असं म्हटलं जातं. हे मात्र सरसकट खरं मानता येणार नाही. जे कडक , कसल्याही मोहाला बळी न पडणारे म्हणून प्रसिद्ध असतात त्याच्या वाटेला कुणी जात नाही. आणि स्त्रियांच्या बाबतीत तर भ्रष्टाचाराचं प्रमाण खूप कमी असतं असं मला वाटतं. अर्थात् त्याचं एक

कारण हे असू शकेल की, पुरूषं अधिका-यांना पार्टी द्यायच्या निमित्ताने किवां अशाच इतर पध्दतीने सहजपणे ॲप्रोच करता येतं तसं स्त्री अधिका-यांना करता येत नाही. पण तुमचा लौकिक कसा आहे हे सगळयात महत्त्वाचं. मग तुम्ही पुरूष असा किंवा स्त्री असा. भ्रष्टाचाराच्या मोहातून सुरुवातीलाच सावरावं लागत. एकदा त्यात वहावत गेलं तर मग स्वतःला सावरण फार कठीण जातं.

एवढ्या मोठ्या अधिकारपदावर असल्यानं एखादं काम करून घेण्यासाठी दडपण आणण्याचा प्रयत्नही खूप होतो. पण दुबळे असलेलेच त्यांना बळी पडतात. तुमचा चांगला लौकिक तयार झाला की लोक चार हात लांबच रहातात. अशा अधिका-यावर दडपण तर येणार नाहीच, उलट आपल्यावर उलटी कारवाईच होईल अशी भीती लोकांना वाटते. अर्थात् कुणालाही जुमानायचं नाही असा दृष्टिकोनही अधिका-याने सरसकट ठेवणे चुकीचा आहे. कामाबाबत इतरांचे मत, विशेषतः त्याच्या अडचणी समजून घेता आल्याच पाहिजेत.

आज इतकी वर्षं घर आणि करियर यांचा तोल मी व्यवस्थित सांभाळू शकले याचं कारण मी दोन्ही गोष्टीना सारखचं महत्व दिलं. नोकरीच्या बाबतीत मी कधीही कसलीही कसूर केली नाही. मग ते रात्री बारा पर्यंत काम करणे असो वा पहाटे चार वाजता उठून कुठं दौ-यावर जाणं असो. पण या वेळेनंतर मुलांचा अभ्यास, घरातल काही काम या गोष्टीही मी तितक्याच आवडीने करते. नुसती करियर करूनही चालत नाही, आपल्या घराला काही सवयीही आपणच लावाव्या लागतात. त्या लावण्यासाठी घरच्यांचा हातभार किती लागतो हे महत्त्वाचं आहे आणि त्याबाबतीत मी खूपच सुदैवी आहे. माझे सासू-सासरे आमच्या जवळ रहात नाहीत. पण जेव्हा येतात तेव्हा तेही समजून मदत करतात. मी उपजिल्हाधिकारी होते तेव्हाची गोष्ट मला आठवते, तेव्हा निवडणुका होत्या.आणि रिटर्निंग ऑफिसर म्हणून माझी नेमणूक झाली होती. निवडणुका पार पडेपर्यंत अनेक गोष्टींसाठी जादा वेळ ऑफिस मधे थांबण मला भाग होतं. त्यावेळेस माझा मुलगा ४-५ महिन्याचा होता. एवढा वेळ बाहेर घालवल्यावर त्याच्याकडे, घराकडे बघणं मला शक्यच नव्हतं. त्यामुळं मग तीन महीने त्याला माझ्या आईनं सांभाळलं.

यादृष्टीने मेहेदळयांच्या सहभागही खूपच मोठा आहे. लग्नानंतर काही वर्षांनी मला बाहेरगावी पोस्टिंग मिळालं. तसं कुठलं तरी पद स्वीकारलं असतं तर मला पुण्याला रहाता आलही असतं. पण जिल्हाधिकारी म्हणून काम करायचं असेल तर मात्र कुंठेही जायची तयारी असावी लागते. माझी ती होती आणि त्यांनीही त्याला कधी आक्षेप घेतला नाही. मुल मात्र त्यावेळेस माझ्याकडेच राहिली. तेव्हा ती खूप लहान होती आणि गाडी, शिपाई अशा सोयी असल्यानं मला त्यांना सांभाळणं अधिक सोपं होतं. मुल मोठी झाल्यावर दौरे करणं कधीच जड गेलं नाही. अशा वेळी मुलांची जबाबदारी त्यांच्याकडेच असते. घरकामाच शेअरिंगही व्यवस्थित आहे. सगळयात महत्त्वाचं काय, तर घरांतील सर्व सदस्यांमधे सांमजस्य असणं. ते असलं की या गोष्टी सहज जमवता येतात.

मात्र हे सामंजस्य नसलं आणि एकमेकांच्या कामाबद्दल आदर नसला तर मात्र गोष्टी अवघड़ होऊन बसतात. एकमेकांच्या कामाबद्दल आदर असणं म्हणजे बायकोनं बाहेर जाऊनच काम केलं पाहिजे असं नाही. घरकाम हेही तितकंच महत्त्वाचं आहे, त्यालाही कष्ट पडतात. त्या कष्टांची बूज राखण, जमेल तेंव्हा त्यांत आपला वाटा उचलण, तसे कष्ट करणा-या व्यक्तीला सम्मानाने वागवण, हे त्या त्या घरातले संस्कार वातावरण आणि सामंजस्यावर अवलंबून असतात. आमच्या घरांत काम करणा-या, विशेषतः स्वयंपाक करणा-या बाईंना आम्ही खूप आदराने वागवतोः पैशाने या भावना व्यक्त करता येत नाहीत कारण शेवटी घर म्हणजे हॉटेल नव्हे.

याबाबतीत एक मुद्दा मला असा मांडावासा वाटतो. नोकरी करणा-या व्यक्तींचे दोन वर्ग असतात. पहिला गरज म्हणून नोकरी करणा-या व्यक्ती आणि दुस-या, काहीतरी करायची उर्मी आहे म्हणून नोकरी करणा-या व्यक्ती. पहिल्या वर्गातल्या व्यक्तींना आर्थिक सुरक्षितता, महत्त्वाची असते, पण दुस-या वर्गातल्या व्यक्ती एखादी गोष्ट आली पाहिजे म्हणून करिअर करतात. त्यामुळे त्यांना कामात आनंद मिळतो. त्याप्रमाणं घरकामातही काहीजणानां आनंद मिळतो. काहींना नाही.

घरकामाबाबत हे सामंजस्य जिथं नसेल तिथं ते निर्माण करावं लांगतं, मोकळा संवाद करावा लागतो. घर चालवण्यासाठी जसं कधी पडतं घ्यायला हवं, तसचं स्वतःची मतं ठामपणे मांडायचा धीटपणाही स्त्रीकडे हवा. दुर्दैवाने हा धीटपणा आज आपल्या बहुसंख्य स्त्रियात दिसत नाही. आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीनंही स्त्रियांना धीट बनवण्यावर जास्त भर द्यायला हवा असं मला वाटतं. माझा या चळवळीतल्या कुठल्याही गटाशी, संघटनेशी संबंध नाही. पण देशातल्या इतर प्रश्नांसारखेच स्त्रियांचे प्रश्नही समजावून ध्यावेत असं मला वाटतं आणि ते सोडवण्याची संधीही काही प्रमाणात मला मिळाली. सांगली जिल्ह्यातल्या जत गावात यल्लम्मा मंदिर आहे. तिथ देवदासी म्हणून मुलींना आणून सोडण्याचे प्रकार चालायचे. जिल्हा अधिकारी असल्यामुळं गावातल्या लोकांना पोलिसांचा धाक वगैरे दाखवून मी हा प्रकार बंद करवला. मी दोन वर्षं तिथं होते त्या काळात हे प्रकार घडले नाहीत, पण नंतर मी पुण्याला आल्यावरही त्या ठिकाणी हा प्रकार झालेला नाही हे महत्त्वाचं. मी तिथं होते. तो पर्यंत त्यांच्या दीक्षा द्यायच्या दिवशी पौष पौर्णिमेला मी जतला कॅंप करून रहायचे. पुढे इंटिग्रेटेड रूरल डेव्हलपमेंट प्रोग्राम खाली मी तिथं प्रशिक्षण केंद्र उघडलं. तिथ काम करणाच्या बायकांना कर्ज, कच्चा माल, मशीन या सगळ्या गोष्टी उपलब्ध करून दिल्या .....इथं पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळात आल्यावर इथले अधिकार वापरून मी या केंद्राला दहा हजारे रू.चा कच्चा माल पाठवला. त्या बायकांनी तयार केलेल्या वस्तू आम्ही विकत घेतल्या. पंधरा देवदासी आणि सात इतरजणींनी आमचा अभ्यासक्रम पूर्ण केला. आता गडहिंग्लज मधेही असंच केंद्र उभारायला आम्हाला मान्यता मिळाली आहे.

स्त्रीमुक्ती चळवळ जर तळागाळातल्या स्त्रियांपर्यंत पोचवायची असेल तर अशा अनेक कामांमधून त्या स्त्रियांना आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या एका पातळी पर्यंत आणून ठेवायची गरज आहे. नुसत्या भाषणांनी हे काम होणार नाही असं मला ठामपणे वाटतं.

मी जे थोडंफार काम देवदासी प्रथेविरूध्द करू शकले त्यावरून माझी अशी खात्री झालीय की आपण स्त्री आहोत म्हणून आपल्याला काम करण्याची संधी मिळत नाही अशी तक्रार करणे चूक आहे. जर आपल्याला जबाबदारीच्या कामावर पोस्टिंग मिळत नसेल तर त्याची इतर काही कारणं असू शकतात याकडे डोळेझाक करण्यापेक्षा आपलं कुठं चुकतंय का हे आत्मपरीक्षण आपण करायला हवे. आपण स्त्री म्हणून आपल्याला अमुक संधी नाकारली गेली, पुंढेही असच होणार अशा पध्दतीनं विचार व्हायला लागला की मग वैफल्य येतं, न्यूनगंड निर्माण होतो. स्त्री म्हणून काही गोष्टी नाकारल्या जात असतील हे मलाही कबूल आहे. पण मग मागासवर्गीय म्हणून, परप्रांतीय म्हणून, वरिष्ठ अधिकारी किंवा मंत्रीपदावरच्या व्यक्तीला अनुकूल नाही म्हणून अशा इतर कारणांमुळेही अनेकदा काही संधी नाकारल्या जातात. जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात हे घडतं. त्यामुळं आजच्या स्त्रीमुक्ती चळवळीत आम्ही बाई म्हणून आमच्यावर अन्याय होतो या पालुपदावर जो भर दिला जातो तो मला चुकीचा वाटतो. हे जर टाळलं तर ही चळवळ अधिक ग्रेसफुल होईल आणि अधिक प्रभावी ठरेल याची मला खात्री आहे.

---